# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०१५ / फाल्गुन २९, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६३**

---

### मुंबई शहरातील हजारो इमारतीमध्ये असणाऱ्या उद्वाहनांची तांत्रिक तपासणी करणाऱ्या निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) * ३२८४ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत हजारो उंच इमारती आहेत, ज्यावर उद्वाहन (लिफ्ट) बसविली गेली आहे, गेल्या काही महिन्यात लिफ्ट अडकल्याच्या अनेक घटना निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्वाहनांचे तांत्रिक विश्वासर्हता तपासण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे असते, हे काम तपासणाऱ्या निरीक्षकांची संख्या अत्यंत कमी असल्याने उद्वाहनाची (लिफ्टची) वेळेत तपासणी होवू शकत नसल्याने मुंबईतील इमारतींच्या उद्वाहनाबाबत अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्वाहनांची तांत्रिक विश्वासर्हता तपासण्याचे काम करणा-या निरिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत व अशा घटना घडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(५) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) निरिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही चालु आहे. तसेच लिफ्ट अडकण्यासारख्या घटना घडू नयेत यासाठी मुंबई व पुणे येथील उद्वाहन कंपन्या व उद्वाहन ठेकेदार यांना उद्वाहनात अतिरिक्त भारयंत्रणा आणि स्वयंचलित आपतकालीन सहाय्य यंत्रणेचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे, अशा आशयाचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

-----------------

**नॉन क्रिमीलेअरची उत्पन्न मर्यादा ४.५० लाख रुपयाऐवजी ६.०० लाख करणेबाबत**

**(२) * २८३५ डॉ.अपूर्व हिरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : तारांकित प्रश्न क्रमांक ११७३ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात -:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मॅट्रीकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्नाची मर्यादा रुपये ४.५० लाखावरुन रु.६.०० लाख करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-१३ ची प्रतिपूर्ती योजना आहे त्याच स्वरुपात सन २०१३-१४ मध्ये चालु ठेवण्याचा निर्णय झाला व त्यानुसार दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयानुसार सन २०१३-१४ मध्ये शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्न मर्यादा रु. ४.५० लाख इतकीच ठेवण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रु. ४.५० लाखांवरुन रु. ६.०० लाख एवढी उत्पन्नाची मर्यादा करण्यासंबंधी मा.मंत्री, सामाजिक न्याय यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी विधीमंडळ सभागृहात दिलेल्या आश्वासनासंदर्भात पुढे कोणता निर्णय घेण्यात येत आहे वा येणार आहे,

(४) नसल्यास, सार्वत्रिक मागणी विचारात घेता उत्पन्नाची मर्यादा रु.६.०० लाख करण्यासाठी शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२), (३) व (४) मा.मंत्री, सामाजिक न्याय यांनी इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाखावरुन रुपये ६.०० लाख करण्याबाबत दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी विधीमंडळ सभागृहात आश्वासन दिले होते. त्यानुषंगाने राज्यातील मॅट्रीकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्वी योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाखावरुन रुपये ६.०० लाख करण्याचा प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर झाला होता. तथापि, सन २०१२-२०१३ ची प्रतिपूर्ती योजना आहे त्याच स्वरुपात सन २०१३-२०१४ मध्ये चालू ठेवण्याचा निर्णय झाला. त्यानुसार दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सन २०१३-१४ मध्ये शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाख इतकीच ठेवण्यात आली आहे.

-----------------

**महाविद्यालयीन मागासवर्गीय विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृती मिळणेबाबत**

**(३) * ३५२२ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गेल्या ३ वर्षापासून थकीत असलेली शिष्यवृत्ती देण्यासाठी २५० कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणा मा.शालेय शिक्षणमंत्री महोदयांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आर्थिक तरतुदीनुसार किती रक्कमेचे व केव्हा वाटप करण्यात आले आहे,

(३) त्याचप्रमाणे राज्यातील किती महाविद्यालये व किती विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले,

(४) अद्याप रक्कमेचे वाटप केले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागारवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी/परिक्षा फी च्या प्रदानासाठी रुपये २३०.५५ कोटीची पुरवणी मागणी माहे डिसेंबर, २०१४ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर करण्यात आलेली आहे. सदर तरतूदीपैकी रुपये २२०.०० कोटीची तरतूद संचालक, विजाभज संचालनालय, पुणे यांना उपलब्ध करण्यात आलेली असून ती वितरीत करण्याची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई परिसरातील खारघर येथील टोलनाका बंद करण्याबाबत**

**(४) * २६६२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खारघरमध्ये रस्त्यांचे काम पूर्ण न करता टोलवसुली करण्याची अंमलबजावणी दिनांक ६ जानेवारी, २०१५ पासून करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पनवेल ते खारघर या दरम्यान विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी बसेस तसेच इतर अनेक वाहनांनवर टोल बंद करण्याचा निर्णय घेण्यात येवूनही वाहनांवर मोठया प्रमाणात टोल घेण्यात येत असल्यामुळे सर्वत्र तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्याने खारघर येथे सुरू करण्यात आलेल्या टोलवसुलीवर लांबच लांब रांग लावून वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत असल्याने जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खारघर येथील सदरची टोलवसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच टोलवसुलीबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(५) असल्यास, प्रश्न भाग-४ बाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) सदर कामाच्या सवलत करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहून या पथकर स्थानकावर पथकर वसुली करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ओबीसी, एससी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती देण्याबाबत**

**(५) * ३८९१ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २३९८ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओबीसी, एससी, व्हीजेएनटी आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१३-२०१४ अखेरची शिष्यवृत्ती वेळेवर न मिळण्याची कारणे काय आहेत,
(२) सन २०१३-२०१४ अखेरचे १ लाख ९५ हजार शिष्यवृत्तीच्या प्रलंबित प्रकरणांपैकी १ ऑगस्ट, २०१४ रोजी संबंधितांना दिलेल्या सूचनांनुसार किती प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत,
(३) अद्याप किती प्रकरणे प्रलंबित आहेत व किती कालावधीत निकाली काढण्यात येतील ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) ज्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत तसेच ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरले आहेत तथापि संबंधित महाविद्यालयांनी त्या विद्यार्थ्यांचे अर्ज विहित कालावधीत संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे सादर केले नाहीत. त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित आहे.
(२) सन २०१३-१४ मधील प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीच्या प्रकरणांपैकी १,५३,६२४ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.
(३) सद्यस्थितीत ४२,०६० शिष्यवृत्तीची प्रकरणे प्रलंबित आहे. सदर अर्जापैकी जे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत त्या महाविद्यालयांना अर्ज त्वरित संबंधित जिल्ह्याच्या समाजकल्याण अधिका-यांना सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असून त्यानुसार प्रलंबित अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर वास्तव्यास असलेल्या लंडनमधील वास्तूबाबत**

**(६) * ३६९० ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.रामहरी रुपनवर, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे १९२१-२२ मध्ये लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिकत असतांना ते किंग हेन्री रोड लंडन येथील वास्तव्याला होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही ऐतिहासिक वास्तुचा लिलाव प्रॉपर्टी एजन्सीने सुरु केला असून ही वास्तु ४० कोटी रुपयाला विकली जात आहे, हेही खरे आहे काय,

(३) तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी मुंबईतील ब्रिटनच्या उच्चायुक्तांना पत्र लिहून लिलाव थांबविण्याची विनंती केली असून ४ महिने लिलाव थांबविण्यात आला होता, हेही खरे आहे काय,

(४) तत्कालीन मा.मुख्यमंत्र्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राहत असलेली लंडन येथील वास्तु ४० कोटी रुपयांना विकत घेण्याची परवानगी केंद्र शासनाला मागीतली असता ती परवानगी न देण्याची कारणे काय आहेत,

(५) आता लंडन येथील ही वास्तु पुन्हा लिलावात काढण्याची तयारी लंडनमधील संबंधीत प्रॉपर्टी एजन्सीने सुरु केली आहे, हेही खरे आहे काय, असल्यास, ही वास्तु विकत घेवून तीचे जतन करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून डी.एस.सी. इन इकॉनॉमिक्स आणि ग्रेझ इन या संस्थेमधून बार ॲट लॉ या पदव्या संपादीत करताना सन १९२१-२२ मध्ये १०, किंग्ज हेन्री रोड, एन.डब्ल्यु.३, लंडन येथे वास्तव्यास होते.

(२) सदर वास्तु खुल्या लिलावाद्वारे विक्री करण्याची जाहिरात या वास्तुच्या मालकाने दि. १ सप्टेंबर, २०१४ रोजी प्रसिध्द केली होती.

(३) व (४) तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी ब्रिटन उच्चायुक्त अथवा केंद्र शासनाशी पत्रव्यवहार केल्याचे आढळत नाही.

(५) दिनांक ३/२/२०१५ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदर वास्तु विकत घेण्यास मा.मंत्रिमंडळाने तत्वत: मान्यता दिली असून त्यासाठी मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांच्या अध्यक्षतेखाली पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी समिती गठीत केली आहे. या समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार सदर वास्तू खरेदीसाठी Asking Price च्या १०% रक्कम संबंधित सॉलिसिटरच्या खात्यात जमा केली आहे.

-----------------

**अकोल्यात एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प राबविण्यासंदर्भात**

**(७) * २९१६ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोल्यात एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प राबविण्यासंदर्भात शासनाच्या विविध विभागाच्या ७ सदस्यांची सुकाणू समिती गठीत करुन १०० कोटी रुपायांची ही योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळातर्फे मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प आर्थिकदृष्टया सक्षम करण्याकरिता नविन प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे आदेश तत्कालिन मुख्यमंत्रीमहोदयांनी महामंडळाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतांनाही उक्त प्रकल्पास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) नाही. तथापि नगर विकास विभागाने शासन निर्णय दिनांक ३१.०८.२००९ अन्वये अकोला शहर एकात्मिक रस्ते विकास योजना बांधा-वापरा व हस्तांतरित करा (BOT) या तत्वावर राबविण्यास रु.८५.७६ कोटी इतक्या रकमेस मंजूरी दिलेली आहे.

(३) वरीप्रमाणे प्रकल्प राबविल्यास जनतेवर पथकराचा भुर्दंड बसणार असल्याने व सद्य:स्थितीत जनतेचा पथकराबाबतचा असंतोष पाहता सदर प्रकल्पाबाबत फेरविचार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सामाजिक न्याय विभागातील तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत**

**(८) * ३७५४ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १७०२ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) विजाभजच्या कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचा-यांच्या वेतनाच्या प्रस्तवाबाबत उच्चस्तर समितीने दिलेल्या निर्देशानुसार प्रस्ताव मा.वित्त मंत्री तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने उच्चस्तर समितीस फेरसादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने पारित केलेल्या अंधश्रद्धाविरोधी कायद्याबाबत जनजागृती करण्याकरीता करावयाची कार्यवाही**

**(९) * ३०५४ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने पारित केलेल्या अंधश्रध्दाविरोधी कायद्याचे उल्लंघन करुन मेळघाटात (जि.अमरावती) येथे अघोरी उपचाराचे प्रकार सर्रासपणे सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींचा वैद्यकीय क्षेत्राबद्दलचा विश्वास संपादन करण्याबाबत त्यांच्यामध्ये जनजागृती करण्याकरीता शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(३) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) पोलीस विभागाचे माहितीनुसार या जिल्ह्यात सदर कायद्यांतर्गत तक्रारी प्राप्त नसून गुन्ह्यांची नोंद नाही.
(२) "महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चटन करण्याबाबत अधिनियम" २०१३ अंतर्गत जनजागृती अभियान व व्याख्यानाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. माता बैठकी, ग्राम आरोग्य पोषण दिन, पोस्टर्स इत्यादी मार्फत आरोग्यविषयक जागृतीकरिता जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे माध्यमातून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे सावकरांकडील कर्ज माफ करण्याच्या घोषणेबाबत**

**(१०) * ४१५५ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शेतकऱ्यांना सावकारी कर्जातून मुक्त करण्यासाठी हिवाळी अधिवेशनामध्ये घेतलेल्या निर्णयानुसार शेतकऱ्याच्या कर्जमाफीचे आदेश दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ च्या आत काढले परंतु सावकारांना दयावे लागणाऱ्या व्याजापोटी ६०-७० कोटी रुपयाची भर पडणार असल्याने शासनाला याकरिता आणखी ४०० कोटी रुपयाहून अधिक रकमेची तरतूद करावी लागणार असल्याने सदर योजनेची अंमलबजावणी होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावकारी कर्जमाफीचे शासनाचे धोरण अद्याप स्पष्ट झालेले नसल्याने सावकारी कर्जमाफीचा खरोखरच किती शेतकऱ्यांना आणि किती रकमेचा लाभ मिळू शकतो हे स्पष्ट झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात खाजगी सावकारांकडे किती शेतकऱ्यांनी शेत जमिनीवर कर्ज घेतल्याची नोंद आहे याबाबतची माहिती आहे काय,

(४) असल्यास, राज्यात कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रमाण वाढलेले असतानाही उक्त योजना अंमलात आणल्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, राज्यशासनाने सावकारी कर्जमाफीचे धोरण आखून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे सावकारांकडील कर्ज माफ करण्याबाबत तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) विधी मंडळाच्या सन २०१४ च्या हिवाळी अधिवेशनात मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.१०.१२.२०१४ रोजी विधानसभेत टंचाई सदृष्य परिस्थिती संदर्भात झालेल्या चर्चेवेळी विदर्भ व मराठवाड्यातील शेतक-यांनी परवानाधारक सावकाराकडून घेतलेले कर्ज शासनामार्फत सावकारांना अदा करुन शेतक-यांना कर्जमुक्त करण्यासंदर्भात निवेदन केले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(२) होय.

तथापि, सावकारी कर्जमाफीचे शासनाचे धोरण निश्चित झाल्यानंतर कर्ज माफीचा लाभ किती शेतक-यांना व किती रकमेचा होऊ शकेल याबाबतची अद्यावत माहिती /निश्चित आकडेवारी स्पष्ट होईल.

(३) खाजगी सावकाराकडून किती शेतक-यांनी शेतजमीनीवर कर्ज घेतले आहे याबाबतची माहिती घेण्यात येत आहे.

(४) व (५) परवानाधारक सावकारांकडून कर्ज घेतलेल्या शेतक-यांना कर्जमुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लासलगांव व येवला (जि.नाशिक) येथील कांद्यावर प्रक्रिया करून उपउत्पादने तयार करण्यासाठी शासनाने आर्थिक सहाय्य देणेबाबत**

**(११) * ३४६५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगांव व येवला (जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत कांद्यावर प्रक्रिया करून उपउत्पादने तयार करणारे उद्योग निर्माण करण्यासाठी शासनाने विशेष आर्थिक सहाय्य देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. लासलगांव व येवला (जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत कांद्यावर प्रक्रिया करणारे उद्योग नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय मुद्रणालयांना नवीन यंत्रसामुग्री शिघ्र गतीने मिळण्याबाबत**

**(१२) * २६९२ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व शासकीय मुद्रणालयांना नवीन यंत्रसामुग्री शिघ्र गतीने मिळण्याबाबत तसेच विभागातील रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(२) कर्मचाऱ्यांचे प्रस्तावित नवीन सेवा प्रवेश नियम लागू करण्याबाबत, शासकीय मुद्रणालय, नागपूर आणि शासकीय मुद्रणालय, वाई येथील इमारतींची पुनर्बांधणी करिता आणि मुद्रणालयीन कामगारांना शिलाई, धुलाई आणि गोपनीय भत्त्यात वाढ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) राज्यातील ८ शासकीय मुद्रणालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी सन २००९-२०१० ते २०१४-१५ या पंचवार्षिक योजनेंतर्गत रु. ३०.६७ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली असून त्यामधून रु. १० कोटी ७३ लाख १० हजार इतक्या रकमेची यंत्रसामग्री खरेदी करण्यात आली आहे. पंचवार्षिक योजनेतील चालू वित्तीय वर्ष २०१४-२०१५ करीता रु. १२.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत असून सदर निधीतून डिसेंबर, २०१४ पर्यंत रु. १ कोटी ३३ लाख ३० हजार इतक्या रकमेची यंत्रसामग्री खरेदी करण्यात आली आहे. उर्वरीत यंत्रसामग्री खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

मुद्रण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मुद्रणालयातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता जाहिरातीव्दारे उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. राज्यसेवेतील पदाकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच पदोन्नती व्दारे भरण्यात येणाऱ्या पदासंदर्भात मुद्रण संचालनालयाच्या स्तरावर व शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) व (३) पहिल्या टप्प्यात मुद्रण संचालनालयाच्या आस्थापनेवरील ३४ तांत्रिक पदाचे नवीन सेवा प्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाची पुनर्बांधणी करण्यासाठी रु. ४६,५१,३०,३००/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता देण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे छाननी आणि मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

वाई येथील शासकीय मुद्रणालयाच्या इमारतीच्या जागेची मालकी मराठी भाषा विभाग/मराठी विश्वकोश मंडळ यांची असून त्यांचेकडून इमारतीचे सुधारीत बांधकाम आराखडे अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

मुद्रणालयीन कर्मचाऱ्यांच्या धुलाई भत्त्यात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून तो शासन स्तरावर तपासण्यात येत आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या गोपनीय भत्त्यात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**न्यायालयाच्या परवानगीशिवाय आणि टेंडर काढल्याशिवाय वृध्दाश्रमाला जमिन देऊ नये असे स्पष्ट निर्देश उच्च न्यायालयाने दिल्याबाबत**

**(१३) * २८६० डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यायालयाच्या परवानगीशिवाय आणि निविदा काढल्याशिवाय वृध्दाश्रमाला जमिन देऊ नये असे स्पष्ट निर्देश उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) सन २००७ या वर्षी पालक व ज्येष्ठ नागरिक देखभाल आणि विकास कायदा अंमलात येऊनही अद्याप त्यांची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृध्दाश्रम चालविणे सरकारला बंधनकारक आहे असा समज न्यायालयाचा झाला असून याबाबत शासनाची बाजू न्यायालयात मांडण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, ज्येष्ठांसाठींच्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती पावले उचलली वा उचलण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण-२०१३ नुसार ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याण योजनांचा साकल्याने विचार करुन ज्येष्ठ नागरिकांचे धोरण आखणे व त्याची अंमलबजावणी करणे यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक परिषद स्थापन करण्यात येत आहे. याशिवाय माननीय मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक कार्यकारी समिती गठीत करण्यात येत आहे. राज्याने प्रत्येक जिल्हयामध्ये वृध्दाश्रम स्थापन करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण पुणे तसेच महसुल व वन विभाग यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

-----------------

## वर्धा जिल्ह्यात रमाई आवास योजनेतील लाभार्थी घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याबाबत

**(१४) * ३४४८ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यात रमाई आवास योजनेतील दारिद्र्यरेषेखालील व नवबौध्द असलेल्या समाजातील नागरीकांसाठी घरकुल योजना राबवूनही डिसेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहापर्यंत घरे मिळाली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाईतपूर येथील दारिद्र्यरेषेखाली येणाऱ्या श्री.तिमाजी मेहरे वय वर्षे ६० यांनी घरकुलासाठी २४ वर्षापासून लढा देवून घरकूल मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वर्धा जिल्ह्यात रमाई आवास योजना पूर्ण क्षमतेने राबविणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

रमाई अवास योजनेंतर्गत डिसेंबर, २०१४ अखेर या योजनेतील पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

श्री.तिमाजी मेहरे हे अनुसूचित जमाती या प्रवर्गातील अूसन, रमाई आवास घरकुल योजना अनुसूचित जाती प्रवर्गासाठी असल्याने ते या योजनेसाठी पात्र लाभार्थी नाहीत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात उद्योगधंद्याच्या वाढीसाठी शासनाने करावयाची कार्यवाही

**(१५) * ३२११ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उद्योगधंद्याच्या वाढीसाठी मा.मुख्यमंत्री यांनी विविध उद्योग समुहांशी माहे डिसेंबर २०१४ रोजी बैठक घेऊन चर्चा केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चर्चेचे फलित काय आहे,

(३) असल्यास, राज्यात उद्योगधंद्यांना चालना मिळण्यासाठी राज्य शासन कोणती पावले उचलणार आहे,

(४) तसेच उद्योगधंद्याकरिता जागा व इतर मंजूरी विनाविलंब देण्याबाबत कोणती उपायायोजना करणार आहे,

(५) अद्याप, प्रश्न भाग ४ बाबत उपाय योजना करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) राज्यातील उद्योग व व्यवसाय स्थापन करण्यासाठी विविध मान्यता व ना हरकती तातडीने व सुलभरीत्या उपलब्ध व्हाव्यात या हेतूने "मेक इन महाराष्ट्र" हा उपक्रम हाती घेण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

(२) प्रस्तूत बैठकीत केंद्र शासनाच्या "मेक इन इंडिया" उपक्रमाच्या धर्तीवर राज्यात "मेक इन महाराष्ट्र" हा उपक्रम हाती घेण्याचे ठरले.

(३), (४) व (५) "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमांतर्गत राज्यातील उद्योगांना लागणारे विविध परवाने / संमती यांची संख्या व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती स्थापन करण्यास तसेच राज्यात गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना लागणाऱ्या विविध परवाने / संमती जलद गतीने उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांची शक्तीप्रदान समिती गठीत करण्यास शासन निर्णय क्रमांक मेइम-२०१४/प्र.क्र./८८ उद्योग-८ दिनांक ८/१/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

"मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमाच्या अनुषंगाने प्रधान सचिव (उद्योग) सातत्याने विविध प्रशासकीय विभागांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेऊन सदर प्रकरणी शासन स्तरावरुन करावयाच्या कार्यवाहीबाबत ठोस व जलद निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करत आहेत.

-----------------

**पीक कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करणेबाबत**

**(१६) * ३६५५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय रिजर्व्ह बँकेने दिनांक ११ मे, २०१२ रोजी पीक कर्जाबाबत सुधारीत योजना जाहिर करुन पीक कर्जासाठी केवळ पीकाचे तारण ठेवणे बाबत बँकांना सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रु. १ लाख मर्यादेतील कर्जाच्या तारणासाठी बँकेने नोंदविलेल्या कर्जाचा बोजा कमी करण्याची मोहिम जिल्हाधिकारी, लातूर यांनी माहे जानेवारी २०१५ च्या सुमारास राबविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिजर्व्ह बँकेच्या उक्त निर्देशानुसार बीड जिल्ह्यासह राज्यातील कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील कर्जाची नोंद कमी करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) उक्त प्रकरणी कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदी कमी करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक ११ मे, २०१२ च्या पीक कर्जाबाबतच्या परिपत्राकानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांच्या दिनांक ०३.०२.२०१५ च्या पत्रान्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बीड व व्यापारी / ग्रामीण बँकांना यांना आर.बी.आय.च्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील बोगस आकडेवारी दाखवत टोलच्या माध्यमातून जनतेची वर्षानुवर्षे लूट करणाऱ्या टोल कंत्राटांच्या चौकशीबाबत**

**(१७) * २९९३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील थोडी मुदत असलेले ५० कोटीहून अधिक रक्कमेचे ४० टोलनाके बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बोगस आकडेवारी दाखवत टोलच्या माध्यमातून जनतेची वर्षानुवर्षे लूट करणाऱ्या संशयास्पद टोल कंत्राटांची चौकशी करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग-१ व प्रश्न भाग-२ बाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अपघाताच्या संख्येत होत असलेली वाढ**

**(१८) * ३०२१ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती दिप्ती चवधरी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर तसेच याच हायवेवरील खंडाळा, खोपोली, सोमाटणे फाटा आणि अमृतांजन ब्रिज या ठिकाणी अपघातात मृत्यू होण्याची संख्या वाढत असून मागील अकरा महिन्यात अपघातात १७६७ मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एक्सप्रेसवरील वाढत्या अपघातांची कारणे शोधण्यासाठी राज्य शासनासने जे.पी.रिसर्च इंडिया प्रा.लि. या संशोधन करणाऱ्या वाहतूक क्षेत्रातील प्रख्यात कंपनीला विंनती केली होती हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीने याबाबतचे संशोधन करून शासनाला शिफारशी केल्या आहेत काय, त्यातील शिफारशींचे स्वरूप काय आहे व सदर शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने अपघात टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा येत आहे?
(४) असल्यास, सदरहू महामार्गावर दिवसेंदिवस अपघातात मृत्यूचे वाढत असलेल्या प्रकाराला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती तातडीची व विशेष अशी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही. पोलीस विभागाकडील माहितीनुसार डिसेंबर २०१४ अखेर अपघातात एकूण १२६ व्यक्ति मृत्यूमुखी पडल्या आहेत.
(२) नाही.
(३) व (४) जे.पी.रिसर्च इंडिया प्रा.लि.या खाजगी कंपनीने पोलीसांच्या परवानगीने एक्सप्रेसवरील वाढत्या अपघातांची कारणे शोधण्यासाठी स्वतःहुन संशोधन केले आहे. या कंपनीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे अप्पर पोलीस महासंचालक (वा), मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला केलेल्या शिफारशी विचारात घेऊन मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आय.आर.सी.निकषाप्रमाणे आवश्यक सुरक्षा उपाय योजना करण्यात आल्या आहेत त्यात सुरक्षा कठडे, आधुनिक पद्धतीचे क्रॅश बॅरिअर्स, गार्ड स्टोन, कॅट आईज, डेलीनेटर, माहिती फलक, ब्लिंकर्स इ.समाविष्ट आहे. अपघात निवारण यंत्रणा (Accident Rescue System) राबविण्यात येत असून त्यात पेट्रोलिंग गाड्या, पेट्रोलिंग स्टाफ, दोन २० टनी क्रेन, दोन २० टनी पुलर, एक ६० टनी पुलर, रुग्ण वाहिका, २ जे.सी.बी. इत्यादी समाविष्ट आहे. वरील सर्व बाबीचे नियंत्रण कुसगाव येथील महामंडळाच्या कंट्रोल रुम वरुन करण्यात येते. तातडीच्या मदतीसाठी टोल फ्री मो.क्र.९८२२४९८२२४ तसेच दर दोन कि.मी. अंतरावर टेलीफोन सुविधा उपलब्ध केली आहे. ट्रॉमा केअर सेंटर व हेलीपॅड सुविधा विकसित करण्यात येत आहे. विशेष उपाय योजना म्हणून २०१२ ते २०१४ या कालावधीत सुमारे १५ कि.मी. लांबीत अपघात प्रवण क्षेत्रामध्ये आधुनिक स्टील वायर रोप क्रॅश बेरियर बसविण्यात आले आहे. याशिवाय मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक नियमन व नियंत्रण महामार्ग पोलीसांकडून करण्यात येते. महामार्ग पोलीस चौक्या/मदत केंद्र उपलब्ध आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई बाजार समितीमधील कंत्राटी सफाई कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(१९) * ३६४० श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई बाजार समितीमधील कंत्राटी सफाई कामगारांनी प्रलंबित मागण्यासाठी दिनांक २० जानेवारी, २०१५ पासून बाजार समिती आवारात धरणे आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील सफाई कामगारांच्या मागण्या काय आहेत,

(३) या मागण्यांपैकी किती मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,

(४) उर्वरित मागण्या मान्य व करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) कंत्राटी सफाई कामगारांच्या १२ मागण्या असून प्रमुख मागण्या वेतनात रु.१२०००/- ने वाढ, सरकारी नियमानुसार महागाई भत्ता व घरभाडे भत्ता, वैद्यकीय भत्ता, प्रवासभत्ता, पोषाखभत्ता, कॅन्टीन सुविधा, दिवाळी बोनस, हजेरी भत्ता, सुट्टया अशा आहेत.

(३) व (४) हे कर्मचारी मुंबई बाजार समितीचे कर्मचारी नसून ते कंत्राटी कर्मचारी आहेत. कंत्राटदाराने पुरविलेल्या कामगारांच्या संख्येप्रमाणे शासनाच्या धोरणानुसार किमान वेतनापेक्षा अधिक वेतन बाजार समिती कंत्राटदारास अदा करते. त्यामुळे कंत्राटी कर्मचा-यांच्या मागण्या मुंबई बाजार समितीने मान्य करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे मागी (ता.करमाळा, जि.सोलापुर) येथील औद्योगिक क्षेत्रात अद्याप उद्योग सुरू करण्यात आले नसल्याबाबत**

**(२०) * ३७१२ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मागी (ता.करमाळा, जि.सोलापुर) येथे १९१५ मध्ये प्रशासकीय क्षेत्र मंजूर झाले असून सन २०१० मध्ये औद्योगिक क्षेत्र म्हणून विकास करण्यास परवागनी देऊन अद्याप उद्योग सुरू करण्यात आले नाहीत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर क्षेत्रात उद्योग सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे, खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शिक्षकांच्या पाल्यांना निःशुल्क सवलत असल्याने फी भरण्याची अट रद्द करण्याबाबत**

**(२१) * २७६४ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासकीय परिपत्रकानुसार विविध व्यवसायिक अभ्यासक्रम पदवीका, पदवी, डी.एड. बी.एड सोडून विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा साडेचार लाख करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही उत्पन्न मर्यादा वाढलेले शैक्षणिक शुल्क, महागाई, वाढलेले खर्च हे गृहीत धरुन केंद्राच्या धर्तीवर ६ लाख रुपये उत्पन्न मर्यादा करण्याबाबत शासन विचार करणार आहे काय,
(३) तसेच माध्यमिक उच्च माध्यमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना निःशुल्क (१ली ते पदव्यूत्तर पर्यंत) शिक्षण सवलत असताना विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शैक्षणिक शुल्क भरण्याची सक्ती केली जाते व त्यानंतर त्यांची प्रतिपूर्ती केली जाते याचे प्रयोजन काय,
(४) निःशुल्क शैक्षणिक सवलत असताना शुल्क भरण्याची लादण्यात आलेली अट शासन रद्द करणार आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) राज्यातील मॅट्रीकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाखावरुन रुपये ६.०० लाख करण्याचा प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर झाला होता. तथापि, सन २०१२-२०१३ ची प्रतिपूर्ती योजना आहे त्याच स्वरुपात सन २०१३-१४ मध्ये चालू ठेवण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाख इतकीच ठेवण्यात आली आहे.
(३) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १९/०८/१९९५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अनुदानित अशासकीय माध्यमिक शाळांतील तसेच उच्च माध्यमिक स्तरावरील पुर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तसेच अध्यापक विद्यालयातील कर्मचा-यांच्या पाल्यांना पदव्युत्तर स्तरापर्यंत निःशुल्क शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमाबाबत ही सवलत मान्यताप्राप्त संस्थेतील फ्री सीटवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच अनुज्ञेय आहे. सन २००३-२००४ पासून फ्री सीट प्रवेश पद्धत बंद झालेली असून सर्व प्रवेश पेमेंट सीट या पध्दतीने होतात.
(४) शैक्षणिक सवलतींबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने शिधापत्रिकेच्या धर्तीवर कुटूंबातील सर्व सदस्यांना जात प्रमाणपत्र म्हणून एकच स्मार्ट कास्ट कार्ड देण्याबाबत**

**(२२) * ३०७९ ॲड.अनिल परब, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने शिधापत्रिकेच्या धर्तीवर कुटूंबातील सर्व सदस्यांना जात प्रमाणपत्र म्हणून एकच स्मार्ट कास्ट कार्ड देण्याचा महात्वाकांक्षी निर्णय नुकताच माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या सुमारास घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकच स्मार्ट कास्ट कार्डचा उपयोग राज्यातील किती लोकांना होणार आहे,

(३) असल्यास, त्यांची अंमलबजावणी केव्हापासून होणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही. अशा प्रकारचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भात वस्त्रोद्योगभिमुख उद्योग सुरु करणेबाबत**

**(२३) * ३९१२ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात मोठया प्रमाणात कापूस उत्पादन होत असल्याने वस्त्रोद्योग धोरणाची आखणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावांवर अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार विदर्भात वस्त्रोद्योगभिमुख वस्त्रोद्योग सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(२) नाही.

(३) व (४) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**नागपूर येथे पावरलूम सर्विस सेंटर उभारण्याचा घेतलेला निर्णय**

**(२४) * ३८५४ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे पावरलूम सर्विस सेंटर उभारण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, केंद्र शासनाने नागपूर येथे पॉवरलूम सर्विस सेंटर सुरु करण्यास दि. २६/२/२०१४ रोजी मंजूरी दिली आहे.

(२) सदर पॉवरलुम सर्विस सेंटर दि. २७/८/२०१४ पासून कार्यान्वित झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील म्हसळा शहराजवळ घोणसे घाट अत्यंत अरूंद आणि वळणावळणाचा असुन या घाटातील रस्ते खराब झालेले असल्याबाबत**

**(२५) * ३१८० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील म्हसळा शहराजवळ घोणसे घाट अत्यंत अरूंद आणि वळणावळणाचा असुन सद्यस्थितीत या घाटातील रस्ते खराब झालेले असुन सदरहू घाट हा डोंगर भागातून गेला आहे तसेच आजूबाजूला डोंगर दऱ्या असुनही या कठडे नसल्याने हा घाट धोकादायक असल्याचे माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरिहरेश्वर येथे अस्थी विसर्जनाचे कार्य मोठ्या प्रमाणात केले जात असल्याने या घाटमार्गावरून हरिहरेश्वर येथे जावे लागत असल्याने वाहनांची संख्याही जास्त असुन सदरहू वाहनचालक जीव मुठीत घेऊन प्रवास करीत आहेत हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करित आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. सद्यःस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत असून आवश्यक त्या लांबीत संरक्षक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील एम.एस्सी.कॉम्पुटर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत**

**(२६) * ३१४७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११-१२ पासून राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे अर्ज ई शिष्यवृत्ती प्रणाली मार्फत भरण्याची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. सदर प्रणालीत काही अभ्यासक्रम झेड प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले असून त्यात एम.एस्सी. कॉम्प्युटर या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. सन २०११-१२ पासून २०१३-१४ पर्यंत या अभ्यासक्रम प्रवेशीत विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही अशी तांत्रिक अडचण निर्माण झालेली आहे. असे जानेवारी २०१५ रोजी निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन संगणक प्रणालीतील ही तांत्रिक अडचण दूर करून सदर विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने काही पावले उचलणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच्या सद्या सुरू असलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेत एस.एस्सी.कॉम्प्युटर या अभ्यासक्रमाचा समावेश नाही. त्यामुळे सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लाभ दिला जात नाही.

(२) व (३) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतंर्गत एस.एस्सी.कॉम्प्युटर व इतर सुधारित अभ्यासक्रमाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### आळंदी, देहू ते पंढरपूर पालखी महामार्ग रूंदीकरणाचे काम रखडले असल्याबाबत

**(२७)** * **४२८० श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी, देहू ते पंढरपूर (जि.सोलापूर) पालखी महामार्ग रुंदीकरणाचे काम रखडले असल्याचे माहे २० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पुढील दोन वर्षात महामार्ग रूंदीकरणाचे काम पूर्ण करण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय वाहतुक मंत्री यांनी केली, परंतु अद्यापपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे याबाबतचा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार झाला नसल्याने रस्त्याची केवळ घोषणा करण्यात आली असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ बाबत महामार्ग रुंदीकरणाचे काम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

(२) याबाबत पत्रव्यवहार झालेला नाही.

(३) आळंदी ते पंढरपूर या पालखी मार्गाच्या एकूण २२९.९६ कि.मी. लांबीपैकी एकूण ५२.४० कि.मी. लांबीमध्ये चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे व ४६.२६ कि.मी. लांबीत चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणांतर्गत प्रगतीत आहे. उर्वरित लांबीचे चौपदरीकरणाचे काम निकष व निधीच्या उपलब्धतेच्या अधिन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी मुलामुलींच्या वसतीगृहात भोजन पुरविण्याकरिता स्थानिक ठेकेदारांची नेमणूक करण्याबाबत**

**(२८) * ४४०५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी मुलामुलींच्या वसतीगृहात भोजन पुरविण्याचे बहुतेक ठेका महिला बचत गटांच्या नावे आहेत. परंतु, अशा प्रकारचे महिला बचत गट अस्तित्वात नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाहेरील ठेकेदार नेमल्याने त्यांनी पुरविलेल्या भोजनामुळे वसतीगृहात नेहेमीच विषबाधेच्या घटना घडत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतीगृहात वारंवार घडत असलेल्या विषबाधा थांबविण्यासाठी भोजन पुरविणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच स्थानिक ठेकेदारांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) वसतीगृहातील मुला मुलींना नेहमीच विषबाधेच्या घटना घडतात ही बाब खरी नाही.

तथापि, माहे जानेवारी, २०१५ मध्ये शिरपूर, जि.धुळे व तलासरी, जि.पालघर येथील वसतीगृहातील मुलींना उलटया, जुलाब व पोटदुखीचा त्रास झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. शिरपूर, जि.धुळे येथील वसतीगृहातील मुलींना वसतीगृहाबाहेरील अन्न खाल्याने त्रास झालेला आहे. वसतीगृहात भोजन पुरवठयामुळेच अशा प्रकारच्या घटना घडतात असे नसून काही वेळेस विद्यार्थ्यांकडून वसतीगृहाबाहेरील अन्न खाल्यामुळेदेखील असे प्रसंग उद्भवतात.

(३) शिरपूर व तलासरी येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृहातील अन्नाच्या नमुन्याबाबतचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेनुसार कारवाई करण्यात येईल.

शासन निर्णय दि.११.११.२०११ नुसार भोजनठेका देताना अनुसूचित जमातीच्या सहकारी संस्था / अनुसूचित जमातीच्या महिलांचे बचत गट / अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना प्राधान्य देण्याबाबतची तरतूद आहे. त्यामुळे स्थानिक ठिकाणाव्यतिरिक्त बाहेरील ठिकाणचे इच्छुक निविदाधारक हे देखील निविदाप्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. भोजनठेका निश्चित करण्यासाठी प्रकल्प स्तरावर ई-निविदा प्रक्रिया राबविली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गावर होणाऱ्या अपघातांसंदर्भात उपाययोजना करणेबाबत**

**(२९) * ४४५६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्ग ६६ वर मोठ्या प्रमाणात लहान-मोठे अपघात होऊन अनेक प्रवासी मृत्यूमुखी पडत असून अनेक प्रवाशी गंभीर जखमी होत असल्याने संबंधित समस्यांविषयी निर्णय घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त महामार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) दिनांक २८.०१.२०१५ रोजी पदाधिकारी व अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. व त्याच अनुषंगाने भूसंपादन प्रक्रियेस गती देण्याकरीता दिनांक ५.०२.२०१५ रोजी संबंधित जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी यांची बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(३) वरील प्रमाणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अनुसूचित जाती व अन्य दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची अडवणुक केली जात असल्याबाबत**

**(३०) * ४७४४ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय समाजाच्या हितासाठी कार्यरत असलेल्या सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जाती व अन्य दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची अडवणुक केली जात असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) अभियांत्रिकी वा तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना त्यात स्थानच देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळावा यासाठी प्रवेश धोरणात बदल करण्यात येणार आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३) व (४) अभियांत्रिकी तसेच इतर तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रत्येक शासकीय वसतिगृहामध्ये निश्चित करुन दिलेल्या कोटयानुसार प्रवेश देण्यात येतो.

तथापि, डिप्लोमा पूर्ण होऊन अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व आयटीआय तसेच पॉलिटेक्निकला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाच्या प्रचलित धोरणात बदल करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**राज्याच्या औदयोगीक क्षेत्राच्या विकासासाठी शासनाने करावयाची कार्यवाही**

**(३१) * ४९६५ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या औदयोगीक क्षेत्रात पाच लाख कोटीची नवी गुंतवणुक व २० लाख रोजगारांच्या निर्मितीसाठी प्रयत्नशील असल्याचे मा. उद्योग मंत्री यांच्याकडून घोषणा करण्यात आल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने उद्योजकांच्या विकासासाठी शासनाने कोणती उपयायोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) राज्य शासनाने शासन निर्णय २२/२/२०१३ अन्वये राज्याचे औद्योगिक धोरण २०१३ घोषित केले असून त्यात औद्योगिक क्षेत्रात पाच लाख कोटीची गुंतवणूक व २० लाख व्यक्तींना रोजगार व दरवर्षी उत्पादन क्षेत्रात १२ ते १३ टक्के वाढ साध्य करणे व त्याचा वाटा राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २८ टक्के पर्यंत वाढविण्याचे निश्चित करण्यात आले आले.

(२) उद्योग धोरण २०१३ चे लक्ष्य साध्य करण्यासाठी खालील उपाययोजना प्रस्तावित आहेत :-

उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रोत्साहन योजना, औद्योगिक वापरासाठी अधिक क्षेत्र उपलब्ध करणे, औद्योगिक क्षेत्रासाठी अधिक पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, गुंतवणूकदारांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे, कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, सामाईक सुविधा केंद्र स्थापन करणे, आजारी उद्योग घटकांचे पुनर्वसन, मुंबई महानगर प्रदेशात औद्योगिक स्थान निश्चयन धोरणात सुधारणा करणे इ. उपाययोजना प्रस्तावित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत**

**(३२) * ५०५८ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील घाऊक बाजारात शेतमाल आणि शेतमालास पूरक वस्तूची विक्री न करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पहिल्या सप्ताहात दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भगवानपूर (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथील पोचमार्गाचे डांबरीकरणाचे निकृष्ठ दर्जाचे झालेले काम**

**(३३) * ५१३५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भगवानपूर (ता.मूल,जि.चंद्रपूर) येथील पूर्वसीत गावाकडे जाणा-या पोचमार्गाच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार मूल तालुका शिवसेना अध्यक्षांनी बांधकाम विभागाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, संबंधीतावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) प्रश्नाधीन विषयाबाबत मूल तालुका शिवसेना अध्यक्ष यांचे दि. १२.०१.२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.
(३) सदर कामाची तपासणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नागपूर यांनी केली असून, त्यांच्या अहवालानुसार प्रस्तुत पोचमार्गाचे डांबरीकरणाचे काम मानकाप्रमाणे असल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहराचा विकास करण्यासाठी वाहनधारकांकडून तीन टोलनाके उभारुन होत असलेली टोल वसुली**

**(३४) * ५४४३ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहराचा विकास करण्याच्या नावाखाली शहराजवळच तीन टोलनाके उभारुन वाहनधारकांकडून टोल वसुल करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराच्या विकास कामाच्या नावाखाली वसुल करण्यात येत असलेले टोल नाके बंद करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. तथापि औरंगाबाद एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या तीन पथकर स्थानकावरील वसुली (नक्षत्रवाडी, सावंगी व लासूर) शासनाने निर्गमित केलेल्या दि. १९.१२.२०१३ च्याअधिसूचनेनुसार सुरु आहे.
(२) सदर प्रकल्पांतर्गत तीन पथकर स्थानकांवरील पथकर वसुली ही अधिसुचनेतील पथकर-दरांनुसार सुरु आहे. प्रकल्पाच्या खर्चाची वसुली झाल्यानंतर पथकर वसुली बंद करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयातील साठ वर्षावरील वृद्धांसाठी असलेल्या निवृत्ती वेतन योजनेचा लाभ तरुण घेत असल्याबाबत**

**(३५) * ५६३० डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील साठ वर्षावरील वृद्धांसाठी असलेल्या निवृत्ती वेतन योजनेचा लाभ तरुण घेत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर धारणीच्या संजय गांधी निराधार योजनेतील चार कर्मचा-यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असल्याचे लक्षात घेता शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय. हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, अमरावती दि. ८/१/२०१५ रोजी धारणी तालुक्याच्या दौ-यावर असताना तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, मौजा हरिसाल ता.धारणी येथील ६ लाभार्थी अपात्र असून त्यांना अनुदानाचे वाटत झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले. या प्रकरणी श्री.आर.यु.फरकुंडे, अव्वल कारकून, श्री.ए.पी.तोटेवाड, कनिष्ठ लिपिक,कु.एस.एस.ठेंग, कनिष्ठ लिपीक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच, श्री.पी.पी. सोळंके, नायब तहसिलदार, संजय गांधी योजना यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना देखिल निलंबित करण्यात आले आहे.
(२) धारणी तालुक्यात तलाठ्यांमार्फत गावनिहाय अपात्र लाभार्थी शोध मोहिम सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बँकांची कृषी कर्जाच्या थकीत कर्ज वसुलीबाबत**

**(३६) * २६६६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळ निवारणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाय योजनामध्ये बँकांनी महत्वाची भूमिका बजावावी अशा सूचना दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिल्या आहेत, ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, संबंधित बँका याविषयी कार्यवाही करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपुऱ्या मान्सुनमुळे कृषी वित्त पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊन गतवर्षीच्या तुलनेत ७% वित्त पुरवठा कमी झाला आहे, हेही खरे आहे काय,

(४) संबंधित बँकांची कृषी कर्जाच्या थकीत कर्ज वसुली बाबत भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

शासनाच्या महसुल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१४/प्र.क्र.२५७/म-७ दि.१४ जानेवारी, २०१५ नुसार शासनाने राज्यातील २३८११ गावांमध्ये ५० पेक्षा कमी पैसेवारीच्या कारणास्तव टंचाई सदृश्य परिस्थिती जाहिर केली असुन त्यानुसार द्यावयाच्या सवलतीमध्ये बँकाकडील सहकारी कर्जाचे पुनर्गठण तसेच बँकाकडील शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. दि.३१ डिसेंबर, २०१४ अखेर राज्यामध्ये बँकांनी रु.२८,२९३ कोटीचे पीककर्ज वाटप करुन ७२ टक्के लक्षांक पुर्तता केलेली आहे. गतवर्षी दि.३१.१२.२०१३ अखेर बँकांनी रु.२५,९८३ कोटीचे पीककर्ज वाटप करुन ७४ टक्के लक्षांक पुर्तता केली आहे.

(४) ज्या गावामध्ये ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहिर केली आहे, अशा गावातील शेतक-यांनी बँकांकडून/कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या (चालू बाकी व थकबाकी) वसुलीस शासनाने स्थगिती दिलेली असल्याने शासनाच्या सुचनेचे अनुपालन बँकांकडून करण्यात येत आहे.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदरबेली येथील पुलाच्या दुरूस्तीबाबत**

**(३७) * ३८९० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदरबली या ठिकाणी पूलाची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाची कठड्यासह त्वरीत दुरूस्ती न केल्यास या ठिकाणी मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याबाबत लोकप्रतिनिधीनी व नागरिकांनी संबंधितांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुलाच्या दुरुस्तीबाबत बांधकाम विभागाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. सदरच्या पूलाचे रेलिंग नादुरुस्त झाले आहे.
(२) होय.
(३) सदर पुलाच्या आवश्यक त्या दुरुस्तीचे काम मंजूर असून निविदा निश्चित झाल्यानंतर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालयांनी बोगस विद्यार्थी संख्या दाखवून शिष्यवृत्तीचा केलेला गैरव्यवहार**

**(३८) * ३६९६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.रामनाथ मोते, डॉ.अपूर्व हिरे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.नरेंद्र पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमत वृत्त समुहाने गडचिरोली जिल्ह्यातील काही संस्थाचालकांनी आदिवासी विभागाची फसवणूक करुन कोट्यावधी रुपयांची शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुदान लाटले हे शिष्यवृत्ती अफरातफर प्रकरण निदर्शनास आणल्यानंतर आदिवासी विभागाच्या गडचिरोली प्रकल्प कार्यालयामार्फत ह्या प्रकरणी सखोल चौकशी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंतिम चौकशी अहवालानुसार जिल्ह्यातील ६ महाविद्यालयांनी क्षमतेपक्षा अधिक बोगस विद्यार्थी दाखवून २ कोटी ९ लाख २७ हजार ३९ रुपयांची शिष्यवृत्ती हडप केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकार संपूर्ण राज्यात घडला असल्याची भिती व्यक्त करुन सखोल चौकशी करण्याची गरज असल्याचा अहवाल एकात्मिक आदिवासी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, आतापर्यंत किती व कोणत्या शैक्षणिक संस्थांच्या विरोधीत फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,
(५) या प्रकरणी दोषी असलेल्यांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे व केव्हापर्यंत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली कार्यालयामार्फत या प्रकल्पांतर्गत महाविद्यालयांमधील शिष्यवृत्ती योजनांच्या गैरव्यवहाराबाबत चौकशी केलेली आहे.
(२) अंशतः खरे आहे.

गडचिरोली प्रकल्पांतर्गत महाविद्यालयांमधील शिष्यवृत्ती योजनांच्या गैरव्यवहाराबाबत केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये एकूण ९ महाविद्यालयांचा गैरव्यवहार उघडकीस आलेला आहे. त्यापैकी ५ महाविद्यालयांनी मंजूर क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी दर्शवून आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभाग या २ विभागांमध्ये मिळून सन २०१३-१४ या वर्षामध्ये रु. १ कोटी, २५ लाख, ८० हजार, ९९१ इतकी अतिरिक्त शिष्यवृत्ती रक्कम घेतली असल्याचे आढळून आले आहे. तर ४ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची बनावट कागदपत्र सादर करुन शिष्यवृत्ती उचल केल्याचे दिसून आले असून या महाविद्यालयांकडून झालेल्या गैरव्यवहाराच्या रकमेबाबतचा पोलीस यंत्रणेमार्फत तपास सुरु आहे.

(३) गडचिरोली प्रकल्पांतर्गत दुरस्थ शिक्षण पध्दतीने अभ्यासक्रम चालविणा-या काही महाविद्यालयातील शिष्यवृत्तीच्या गैरव्यवहाराबाबतची प्राथमिक माहिती व एका संस्थेविरुध्द गुन्हे दाखल केल्याबाबतचा तपशिल प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांनी दि. ३०.१२.२०१४ च्या पत्रान्वये शासनास सादर केला, हे खरे आहे.

(४) गडचिरोली जिल्ह्यात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली या प्रकल्पांतर्गत ९ महाविद्यालयांवर प्रकल्प कार्यालयाकडून गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सदर ९ महाविद्यालयांमध्ये १) शिवाजी कॉलेज, वडसा, २) शिवनेरी इंस्टिटयुट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, गडचिरोली, ३) स्वर्गीय राहुलभाऊ बोम्मावार कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, चामोर्शी, ४) सावित्रीबाई फुले इंस्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, गडचिरोली, ५) ॲस्पायर कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी, गडचिरोली, ६) शालोम कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, गडचिरोली, ७) गुरुसाई कॉलेज ऑफ टेक्नीकल अँड मॅनेजमेंट, आष्टी, ८) विद्याभारती कॉलेज, गडचिरोली व ९) समर्थ बालाजी कॉलेज ऑफ टेक्नीकल एज्युकेशन, गडचिरोली यांचा समावेश आहे.

(५) प्राथमिक चौकशीनुसार ९ महाविद्यालयांवर फौजदारी गुन्हे दाखल केलेले असून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली या कार्यालयातील सदर प्रकरणाशी संबंधीत तत्कालीन प्रकल्प अधिकारी, व संबंधित लिपीक, यांना निलंबित करण्यात आले आहे.

गडचिरोली प्रकल्पातील शिष्यवृत्तीतील गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क योजनांची सखोल चौकशी करावी तसेच गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना आयुक्त, आदिवासी विकास यांना शासन पत्र दि. २०.०१.२०१५ अन्वये दिलेल्या आहेत.

सदर गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार शिष्यवृत्ती योजनांमधील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी पथक स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव गृह विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.

-----------------

**राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील अमरावती ते जळगांव व जळगांव ते गुजरात हद्दीपर्यंतचे चौपदीकरणाचे कामाबाबत**

**(३९) * २९१४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील अमरावती ते जळगांव व जळगांव ते गुजरात हद्दीपर्यंतचे चौपदीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एन.एच.ए.आय.) मार्फत सुरु करण्याबाबत मार्ग काढण्यासाठी सदरचा रस्ता हा एनएचएआय कडे असल्यामुळे हे काम तातडीने हाती घेण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गतसत्रात लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान मा.मंत्रीमहोदयांनी एक महिन्यांत निर्णय घेऊन केंद्रीय मंत्रीमहोदयांसमवेत बैठक लावून निर्णय घेण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर बैठकी बाबतचा पाठपुरवठा केंद्रशासनाकडे सुरु आहे.

(४) वरीलप्रमाणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील अशोकनगर येथील विविध योजनेतील घरकुले प्रलंबित ठेवल्याबाबत**

**(४०) * ५६०४ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील अशोकनगर येथे वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेची घरकुले २००७-२००८ मध्ये बांधण्यात आली असून त्या भागात विकास आराखड्यातील रस्त्याचे कारण सांगुन रमाई आवास योजनेतील व आय.एस.एच.डी.पी.योजनेतील बैठी घरकुले प्रलंबित आली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त बैठी घरकुले पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

सद्स्थितीत रमाई आवास योजनेंतर्गत घरकुलांचे बांधकाम सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत**

**(४१) * ५१८४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये दरवर्षी कार्यकारी अभियंता, नागपूर विद्‌युत विभाग, नागपूर यांच्या अंतर्गत रामगीरी, देवगीरी, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, नागभवन, राजभवन, हैद्राबाद हाऊस व नविन आमदार निवास येथील विद्‌युत उपकरणाच्या देखभाल व दुरुस्तीकरीता तात्पुरत्या स्वरुपात कामगारांची नियुक्ती करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामगारांना त्यांनी केलेल्या सेवेचा लाभ मिळावा म्हणून पी.डब्ल्यू.डी. क्षेत्रिय कामगार संघटना, नागपूर यांनी उक्त कामगारांना त्यांच्या पात्रतेनुसार सदरील सेवेत कायम करण्याबाबत वेळोवेळी मोर्चे, धरणे, आंदोलने करुन सुध्दा संबंधित विभागाने वर्तमान पत्रात जाहीरात देवून तेथे इतर उमेदवारांची नेमणूक करण्यात येवून या कामगारांवर अन्याय करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना सदरील विभागात कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात रोजंदारी कर्मचारी नेमण्यात येतात.

सेवाप्रवेश नियमानुसार नियमित पदावर भरती केली जाते. ऑगस्ट २०१४ मध्ये याकरीता भरतीप्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. या पदांकरीता विहित पात्रता धारण करणारे रोजंदारी कर्मचारी अर्ज करण्यासाठी पात्र होते.

-----------------

**नाशिक जिल्हयातील इगतपूरीसह राज्यात पाच क्रिडा प्रबोधिनी स्थापन करण्याबाबत**

**(४२) * ३४७५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील इगतपूरीसह राज्यात पाच क्रिडा प्रबोधिनी स्थापन करण्यास माहे ऑगस्ट, २००९ मध्ये आदिवासी विकास विभागाने मंजूरी देवूनही माहे जानेवारी, २०१५ पर्यंत सदर प्रबोधिनींची स्थापना झालेली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमातीच्या मुलांना क्रीडा विषयक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उक्त क्रीडा प्रबोधिनी तातडीने स्थापन करण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्‌याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) आदिवासी विकास विभागाने राज्यात पाच क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला नाही. परंतु, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.२४.०८.२००९ अन्वये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता इगतपुरी, जि.नाशिक येथे क्रिडा प्रबोधिनी स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. सदर क्रीडा प्रबोधिनीकरिता प्रिप्री सद्रोद्यीन, ता.इगतपुरी येथे जमीन प्राप्त झालेली असून शासन निर्णय दि. २९.०५.२०१४ अन्वये प्रबोधिनीच्या प्रथम टप्प्यातील बांधकामासाठी रु. २५.०० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे. याप्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवरील अपघातांची वाढती संख्या लक्षात घेता जखमींना तात्काळ वैद्यकिय सुविधा पुरविण्याबाबत**

**(४३) * २८६४ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवरील अपघातांची वाढती संख्या लक्षात घेता जखमींना तात्काळ वैद्यकिय सुविधा उपलब्ध व्हावी याकरिता या मार्गावर सुसज्ज वैद्यकिय व्हॅन ठेवण्याचा प्रस्ताव शासनाचा विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या व्हॅनमध्ये कोणकोणत्या वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(३) तसेच एक्सप्रेस वेवर वरील अपघात प्रवण ठिकाणावरील दुभाजकांवर वायर बांधणे व या रस्त्याचा विस्ताराचा प्रस्ताव, खालापूर टोलनाका ते सिंहगड संस्थेपर्यंत भुयारी मार्ग या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, या निर्णयानुसार आतापर्यंत या एक्सप्रेस वेवर कामे करण्यात आली आहे काय व उर्वरित कामे किती कालावधीत पूर्ण करण्याचे शासनास अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) प्रस्तावित क्रॅश रेस्क्यू व्हॅन मध्ये अपघातग्रस्तांना तातडीची प्रथमोपचार (फर्स्ट एड) वैद्यकीय मदत व याशिवाय त्यांना अपघातग्रस्त वाहनातून तात्काळ व सुरक्षितपणे बाहेर काढण्याची सुविधा असणार आहे.

(३) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अपघात प्रवण क्षेत्रांतील एकूण १५ कि.मी. लांबीसाठी दुभाजकांवर आधुनिक स्टील वायररोप बसविण्यात आले आहेत. सदर रस्त्याच्या वाहतूक क्षमता वाढीचा प्रस्ताव व खालापूर टोलनाका ते सिंहगड संस्थेपर्यंत भुयारी व उन्नत मार्गाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) एकूण १५ कि.मी. लांबीत वायररोप यशस्वीपणे बसविण्यात आले आहेत. त्याठिकाणी अपघाताचे गांभीर्य कमी करण्यात उपयोग झाला आहे. उर्वरीत कामांबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**चंपावती अर्बन को.ऑप.बँक मर्या बीडच्या अवसायक मंडळाने**
**केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करणेबाबत**

**(४४) * ३६६८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३ ला दिनांक ११/१२/२०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:**
सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंपावती अर्बन को.ऑप.बँक. मर्या, बीडच्या अवसायक मंडळाने केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करणे बाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभिप्रायातील निष्कर्ष कोणते, दोषीविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत शासन कोणती कार्यवाही करत आहे,

(३) उक्त बँकेच्या लेखापरिक्षणास होत असलेल्या विलंबामुळे दोषींना पाठिशी घालण्याचा प्रयत्न संबंधित अधिकारी संगणमताने करत आहेत काय, लेखा परिक्षणास होत असलेल्या विलंबाची कारणे कोणती,

(४) उक्त बँकेत बँकेचे निबंधक हे अवसायक मंडळाचे अध्यक्ष असून गैरव्यवहाराचे पुरावे त्यांच्याकडे असतानाही दोषीविरूध्द कारवाईस विलंब का होत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अद्याप अभिप्राय प्राप्त झाले नाहीत. तथापि, विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, बीड यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना दि.३०.१.२०१५ रोजी सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालात फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत उल्लेख नसल्याने गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. मात्र दि.५.३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी फौजदारी कार्यवाही होऊ शकते किंवा कसे याबाबत जिल्हा सरकारी वकिल यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(३) व (४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना दि.३०.१.२०१५ रोजी सदर बँकेचा लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला असून, अहवालाची छाननी करण्यासाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे पाठविला असता, त्यांनी लेखापरीक्षण अहवाल व प्रशासकिय अहवाल स्वयंस्पष्ट असून, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतूदीस अनुसरुन कारवाई करण्याबाबत कळविले. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी कलम ८८(१) प्रमाणे प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्याकरीता दि.२१.२.२०१५ च्या पत्रान्वये प्राधिकृत अधिका-याची नियुक्ती केलेली आहे.

-----------------

**राज्यातील नागरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत आर्थिक संकटात सापडलेल्या सहकारी बँकांना पॅकेज देण्याबाबत**

**(४५) * ११५७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकारी बँकांचा मोठा वाटा आहे अनेक सहकारी बँका आर्थिक अडचणीत आहेत त्यांना मदतीची गरज आहे या बँका आर्थिक संकटात सापडू नयेत यासाठी त्यांना पॅकेज देण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने राज्यातील कोणत्या बँकाना किती मदतीची गरज आहे याचा आढावा घेऊन किती पॅकेज देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, आर्थिक संकटात सापडलेल्या सहकारी बँकेला पॅकेज देण्याचे जाहिर केल्यानंतर पॅकेजसाठी चालू आर्थिक वर्षात तरतूद करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त होताच उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहाचे अनुदान व कर्मचाऱ्यांचे वेतन तातडीने देणेबाबत**

**(४६) * ४९३३ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरसह राज्यातील अनेक जिल्ह्यातील समाजकल्याण विभागातील अनुसूचित जाती-जमाती व भटक्या, विमुक्त विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचे अनुदान व कर्मचाऱ्यांचे वेतन थकल्याने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यानच्या चौथ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहाचे अनुदान व कर्मचाऱ्यांचे वेतन तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) व (३) सदर योजनेसाठी सुरवातीस रु. ११२.८०७ कोटी एवढी तरतूद मंजूर करण्यात आली होती. मात्र, सदर निधी अपुरा पडत असल्याने विधानमंडळाच्या सन २०१४ च्या हिवाळी अधिवेशनात रु. २४.०० कोटी इतक्या रकमेची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आलेली आहे. याखेरीज, सुधारित अंदाजपत्रकामध्ये निधीची मागणी करण्यात आली असून निधीच्या उपलब्धतेनुसार वसतिगृहाचे अनुदान व कर्मचाऱ्यांचे वेतन देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा येथील आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळण्याबाबत**

**(४७) * २७७२ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय भंडारा, जि.भंडारा अंतर्गत किती अनुदानित आदिवासी आश्रम शाळा सुरु आहेत,

(२) या शाळांमध्ये किती शिक्षक व कर्मचारी कार्यरत आहेत,

(३) या शाळांमधील शिक्षक कर्मचा-यांना दरमहा नियमित वेतन अदा केले जाते काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(५) या प्रकरणी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी पत्र पाठवून नियमित वेतन अदा करण्याची मागणी केली हे खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, भंडारा, जि.भंडारा अंतर्गत एकुण ०८ अनुदानित आश्रमशाळा सुरु आहेत.

(२) उपरोक्त शाळांमध्ये ९८ शिक्षक व ९५ शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकुण १९३ कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) व (४) राज्यातील सर्व अनुदानित आश्रमशाळा नियमित वेतन अदा करण्याच्या सूचना शासनाच्या दिनांक २.१.२०१५ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. आदिवासी विकास विभागांतर्गत अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते "आश्रमशालार्थ" प्रणालीव्दारे अदा करण्याचा निर्णय दि.३१.१०.२०१२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून, त्यानुसार भंडारा प्रकल्पांतर्गत माहे, डिसेंबर, २०१४ पर्यंतचे वेतन कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेले आहे.

(५) व (६) होय, सदर पत्राच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करुन शासनास अवगत करण्याच्या सूचना आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना शासन पत्र दि.३१.१.२०१५ अन्वये देण्यात आल्या आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऊस उत्पादक शेतक-यांना उत्पादन खर्चावर आधारित रास्त व किफायतशीर भाव देण्याबाबत

**(४८) * ५०९९ श्री.प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस उत्पादक शेतक-यांना उत्पादन खर्चावर आधारित रास्त व किफायतशीर भाव (एमआरपी) देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, एमआरपीनुसार ऊसाची रक्कम शेतक-यांना देण्याचे आदेश मा.आयुक्तांनी कारखान्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार किती कारखान्यांनी एमआरपीनुसार शेतक-यांना ऊसाची रक्कम दिली आहे,

(४) तसेच कोणकोणत्यास कारखान्यांनी एमआरपी प्रमाणे शेतक-यांना ऊसाची रक्कम दिली नाही त्या ऊस कारखान्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली ऊस नियंत्रण मंडळाची बैठक दि. १५/११/२०१४ रोजी घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीमध्ये ऊसाचा पुरवठा केल्यानंतर विहीत कालावधीत साखर कारखान्यांनी FRP दर ऊस उत्पादकांना अदा करावा असा निर्णय घेतला आहे.

(२) होय.

साखर आयुक्त यांनी साखर कारखान्यांना FRP अदा करणे संदर्भात साखर आयुक्तालयामध्ये वेळोवेळी सुनावण्या घेवून ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना FRP नुसार रक्कम देण्याचे आदेश दिलेले आहेत.

(३) सन २०१४-१५ चे हंगामामध्ये माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर १७८ कारखान्यांनी गाळप हंगाम सुरु केलेला असून ४४ साखर कारखान्यांनी FRP प्रमाणे दर अदा केलेला आहे.

(४) ऊस नियंत्रण आदेश, १९६६ मधील तरतुदीनुसार सन २०१४-१५ च्या हंगामामध्ये थकीत FRP बाबत १) कुमदा-रयत, सातारा २) कुंटरकर शुगर्स, नांदेड व ३) जयलक्ष्मी शुगर्स-उस्मानाबाद या तीन कारखान्यांवर RRC निर्गमित करण्यात आलेली आहे. उर्वरित साखर कारखान्यांवर सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील आदिवासी आश्रमशाळेस निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४९) * ४२३३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील ९० टक्के आदिवासी आश्रमशाळांची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळांकडे अधिका-यांचे दुर्लक्ष होत असल्याचेही आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदिवासी विकासाच्या आश्रमशाळेची दयनीय अवस्था सुधारण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रकल्प कार्यालय शहापूर यांचे अंतर्गत २३ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून त्यापैकी ७ आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत भरविण्यात येतात येथील इमारतींची स्थिती चांगली असून विद्यार्थीनीकरीता आंघोळीसाठी व स्वतंत्र शौचालय व्यवस्था उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना सकस व पौष्टीक आहार दिला जात आहे त्यात अंडी, केळी, सफरचंद व पोटभर दोन वेळच्या जेवनाचा समावेश आहे. त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सुविधा वर्ष सुरू होताच वेळेवर पुरविण्यात आलेल्या आहेत. आश्रम शाळांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी व त्यांची तपासणी कामी शिक्षण विभाग स्वतंत्र असुन त्यांच्या मार्फत ही वेळोवेळी तपासणी करून त्यांच्या त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या की नाही याचीही पाहणी करण्यात येत असते.

(३) प्रकल्पातील २३ पैकी २० आश्रमशाळा इमारत बांधकामांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. जून २०१५ पासून सुरू होणा-या शैक्षणिक सत्रात त्यापैकी काही नविन इमारती पुर्ण होऊन ताब्यात मिळणार आहेत. जिल्हास्तर योजनेतुन सन २०१४-१५ मध्ये आश्रमशाळांच्या बांधकामासाठी रु.८००.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व सन २०१५-१६ साठी ५००.०० लक्ष उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. आश्रमशाळाच्या बांधकाम दुरूस्ती व इतर सुविधा यासाठी मागणी नुसार निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरज-पंढरपूर राज्य महामार्गावरील पूलाची तातडीने दुरूस्ती करण्याबाबत

**(५०) * ४२८४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज-पंढरपूर राज्य महामार्गावरील सांगोला तालुक्यातील वाटंबरे येथील पूलाची दुरावस्था झाली असून पुलावर जागोजागी खड्डे पडले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पूलाची तातडीने दुरूस्ती करावी अशी वाहनधारकांकडून व सामाजिक कार्यकर्त्यांकडून पत्रव्यवहारव्दारे मागणी करण्यात येऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

सद्य:स्थितीत सर्व पूलांवरचे खड्डे भरुन घेण्यात आले आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

सदर पूलाची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी असून सदर पूलाचे दुरुस्तीचे काम सन २०१४-१५ च्या केंद्र शासनाच्या वार्षिक आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

(३) सद्य:स्थितीत अंदाजपत्रक करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**एमआयडीसींमध्ये शासनाने अल्पदरात दिलेल्या जमिनीवर उद्योग उभारण्यासाठी अनेक उद्योजकांनी घेतलेल्या कर्जाबाबत**

**(५१) * ४४६२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील महापे औद्योगिक क्षेत्रातील ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टा, तळोजा एमआयडीसी, तसेच पनवेल औद्योगिक क्षेत्रातील पनवेल, महाडा व रोहे येथील एमआयडीसींमध्ये शासनाने अल्पदरात दिलेल्या जमिनीवर उद्योग उभारण्याचा व्याप अनेक उद्योजकांनी केला असून बँका व वित्तसंस्थांकडे जमीन तारण ठेवून उद्योजकांनी कोटयावधींची कर्जे घेतली असल्याचे माहे २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणात कर्ज घेतलेल्या उद्योजकांनी मोठया प्रमाणात गैरप्रकार केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कर्ज घेतलेल्या उद्योजकांनी माहिती घेऊन त्यांचेवर काय कारवाई केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना भूखंड वाटप केल्यानंतर उद्योजक भूखंड / भूखंडावरील इमारत व त्यावरील स्थावर जंगम मालमत्ता वित्तीय संस्था / बँका यांच्याकडे तारण ठेवून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे संमतीपत्र घेण्यासाठी विनंती करतात. तदनंतर उद्योजक वित्तीय संस्था / बँका व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा करण्यात येतो. जर एखादा उद्योजक कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यास, वित्तीय संस्था / बँका वसुलीसाठी त्या उद्योजकाचा भूखंड ताब्यात घेऊन त्याची लिलावाद्वारे विक्री करुन कर्जाची रक्कम वसूल करण्यासंबंधीची कार्यवाही करतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मागासवर्गीय व अपंगांसाठी विविध योजनाचा फायदा मूळ लाभार्थींना मिळत नसल्याबाबत**

**(५२) * ४७५२ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून मागासवर्गीय व अपंगांसाठी विविध योजनाचा फायदा मूळ लाभार्थींना मिळत नाही तसेच पुरेसे मनुष्यबळ नसल्याने त्यांचाही फटका योजनांच्या अंमलबजावणीला बसतो ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनांमध्ये सुसुत्राता आणण्यासाठी त्यास काही बदल करण्याच्या शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा निर्णय केव्हापासून अंमलात आणण्यात येणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) ते (३) सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातुन मागासवर्गीय व अपंगांसाठी विविध योजनाचा फायदा मुळ लाभार्थ्यांना देण्यात येत असुन मनुष्यबळाच्या दृष्टीने रिक्त पदे वेळोवेळी विहीत पद्धतीने भरण्यात येतात. सद्यस्थितीत रिक्त पदांसाठी सरळसेवा भरतीन्वये उमेदवारांची निवड करण्यासाठी माहे जानेवारी २०१५ मध्ये लेखी परिक्षा घेऊन उमेदवारांची निवड करण्यात येत आहे. तसेच पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे पात्र कर्मचा-यामधुन भरण्याची कार्यवाही देखील सुरू आहे.

-----------------

**राज्यातील भूविकास बँका आर्थिक अडचणीत आल्याने त्यांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत**

**(५३) * ५०५९ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूविकास बँका आर्थिक अडचणीत आल्याने त्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पहिल्या सप्ताहात शासनाने समिती स्थापन केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने भू-विकास बँकाना वाचविण्यासाठी कोणते निर्णय घेतले आहेत,

(३) असल्यास, सदर निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यातील भू-विकास बँकेसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या दि. २७.११.२०१४ च्या बैठकीत सादर केला असता सदर प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार दि. १७.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात आली आहे.

(२) (३) व (४) मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक ६.१.२०१५, दि. २७.१.२०१५ व दि. २४.२.२०१५ रोजी बैठका घेण्यात आल्या असून सदर बैठकीत मंत्रीमंडळा समोर ठेवण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा झालेली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यांनतर मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**अमरावती आदिवासी अप्पर आयुक्तालया अंतर्गत येणाऱ्या ७ प्रकल्प अधिकारी कार्यालयामध्ये ९१५ पदाचा अनुशेष असल्याबाबत**

**(५४) * ५१४६ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती आदिवासी अप्पर आयुक्तालया अंतर्गत येणाऱ्या ७ प्रकल्प अधिकारी कार्यालयामध्ये ९१५ पदाचा अनुशेष आहे असे दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशस्त इमारत व पुरेशा व्यवस्था असून सुध्दा अद्यापपर्यंत रिक्त पदे भरण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अति महत्वाची कामे प्रलंबित असून कामे वेळेवर होत नाहीत अशी जनतेची तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करीत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) अंशत: खरे आहे. अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी कार्यालयांमध्ये सुमारे ३०३ पदे रिक्त आहेत.

(३) रिक्त पदांचे कामकाज अतिरिक्त कार्यभार देवुन करण्यात येत आहे. त्यामुळे अशा प्रकारची तक्रार आढळून आलेली नाही.

(४) रिक्त पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**औरंगाबाद येथील ए.एस.क्लबपासून पैठण रोडपर्यंत लिंक रोडचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(५५) * ५४४४ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वाळूज महानगरालगत असलेल्या ए.एस.क्लबपासून पैठण रोडपर्यंत सुमारे ४.५ किमीच्या लिंक रोडचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने ठिकठिकाणी खड्डे पडून रस्ता अतिशय खराब झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच रस्त्याचे निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नागपूर-औरंगाबाद-सिन्नर-घोटी रस्त्यावरील टोल बंद केल्यानंतर या रस्त्यावर वाहतूक वर्दळ वाढली असल्याने किरकोळ खड्डे पडलेले होते, तथापि ते त्वरीत कंत्राटदाराने दोष दायित्व कालावधी मध्ये डांबरीकरणाव्दारे स्वखर्चाने दुरुस्त केले आहेत. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील रहदारीच्या रस्त्यावरील टोल वसुली बाबत शासनाने सहा चार्टड अकाऊंटंटची समिती नेमल्याबाबत**

**(५६) * २६६९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रहदारीच्या रस्त्यावरील टोल वसुली बाबत शासनाने सहा चार्टड अकाऊंटंटची समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोलमुक्त महाराष्ट्र धोरण राबविण्या संदर्भात समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, अहवालातील निष्कर्ष काय आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(४) तसेच राज्यात १२३ ठिकाणी टोल वसुलीचा प्रश्न गंभीर होत असून अनेक सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधी टोल वसुली बंद करण्याची मागणीसाठी आंदोलन करत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, टोलमुक्त महाराष्ट्र करून राज्यातील सर्व टोलनाके बंद करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करत आहे वा करण्यात ये आहे,

(६) अनेक कंत्राटदार अवाजवी टोल आकारून वाहन धारकांनी फसवणूक करत असल्याच्या तक्रारी बाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, परंतु मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

(२) ते (६) खाजगीकरण प्रकल्प व पथकर स्थानकांच्या अडचणींचा अभ्यास करणेस्तव समिती स्थापन केली आहे. समितीच्या अहवालानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**कापूस पणन महासंघाकडून हमीदराने शेतकऱ्यांचा कापूस खरेदीबाबत**

**(५७) * ३८९२ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६६६ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चालू हंगामात जवळपास ८० लाख गाठी कापसाचे उत्पादन अपेक्षित असताना शेतकऱ्यांचा कापूस बाजारात कमी भावाने विकला जावू नये म्हणून राज्य मंत्री मंडळाने ३० कोटी रकमेचा कापूस पणन महामंडळास कर्ज स्वरुपात देण्यास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कापूस पणन महामंडळास ३० कोटी रकमेची कर्ज उचल प्रत्यक्षात देण्यात आली आहे अगर कसे,

(३) कर्ज उचल देण्यात आली असल्यास केव्हा, कर्ज उचल दिल्यानुसार कापूस पणन महामंडळाने शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करण्यास सुरूवात केली आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यंत किती क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हंगाम २०१४-१५ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या., यांना शासनाने कापूस उत्पादक शेतक-यांकडून कापूस खरेदी करण्यासाठी रु.५०/- कोटी इतकी रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करून दिलेली आहे.

(२) शासनाने महासंघास रु.५०/- कोटी इतकी रक्कम कर्ज स्वरुपात दिलेली असून बँकांकडून कर्ज घेण्यासाठी रु.७००/- कोटीची हमी दिलेली आहे आणि रु.६०० कोटी हमीचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) कापूस पणन महासंघाने दि.१५.११.२०१४ पासून कापूस खरेदी करण्यास सुरूवात केली आहे.

(४) कापूस पणन महासंघाने दिनांक १५.११.२०१४ ते दिनांक ३.३.२०१५ पर्यंत एकूण २६.४४ लाख क्विंटल कापूस खरेदी केला आहे.

-----------------

**पूर्वीच्या मान्य झालेल्या सेझ प्रकल्पावर आतापर्यंत १.६० लाख कोटीची गुंतवणूक अडकली असल्याबाबत**

**(५८) * ५१८६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सेझ प्रकल्पाचा आढावा जोपर्यंत पूर्ण होत नाही तो पर्यंतच्या कालावधीत कोणत्याही नव्या प्रकल्पाचा शासनाकडून विचार केला जाणार नसल्याचे मा.उद्योगमंत्री यांनी नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दुसऱ्या सप्ताहात जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीच्या मान्य झालेल्या प्रकल्पावर आतापर्यंत १.६० लाख कोटीची गुंतवणूक अडकली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) राज्यातील सेझ प्रकल्प राबविताना सर्व घटकांना येत असलेल्या अडी-अडचणी संदर्भात समस्यांचा आढावा घेण्यात येत आहे.

(२) केंद्र सरकारने महाराष्ट्रातील एकूण १३९ विशेष आर्थिक क्षेत्रांना तत्वत:/अंतिम/अधिसूचित या प्रकारात मान्यता प्रदान केली आहे. त्यापैकी ६१ प्रकल्पाच्या विकासकांनी माघार घेतली असून उरलेल्या ७८ विशेष आर्थिक क्षेत्रापैकी ५२ अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रामधून २५ विशेष आर्थिक क्षेत्र कार्यान्वित झाले आहेत.

राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पातून विकासकांनी माघार घेण्यामागे अथवा ५२ अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी कार्यान्वित झालेले २५ विशेष आर्थिक क्षेत्र वगळता उर्वरीत २७ विशेष आर्थिक क्षेत्राचे विकासक प्रकल्प उभारणीस विलंब होण्यामागे केंद्र सरकारचे विशेष आर्थिक क्षेत्राविषयी बदललेले धोरण किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक मंदी ही कारणे असावीत.

(३) राज्य शासनाने विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रकल्प कार्यान्वीत होण्यासाठी मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्तावांच्या छाननी करण्याच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी समितीचे गठन केले असून, विशेष आर्थिक क्षेत्राच्या अडचणी जलद गतीने सोडविण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदान समितीचे गठन करण्यात आले आहे. शासनाने विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासकांना व घटकांना मुद्रांक शुल्कातून सूट, मूल्यवर्धित कराचा कालबध्द पध्दतीने परतावा, अकृषिक आकारणीतून सूट तसेच गौण खनिजाच्या स्वामीत्वधन आकारणीतून सूट देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १५/१०/२०११ रोजी निर्गमित केला आहे.

विशेष आर्थिक क्षेत्र व निर्यात प्रवण घटक यांच्यासाठी नवीन उपाययोजना आखण्यासाठी स्वतंत्र धोरणाचा मसुदा तयार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सामाजिक व आर्थिक मागासवर्गातील युवकांना स्वयंपूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(५९) * ३४६० श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ६५९ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाच मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळांकरिता २५८ कोटी रूपयांच्या कर्ज हमीबाबत काढलेला शासन निर्णय रद्द करण्यात आल्याची गंभीर बाब दिनांक १६ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर महामंडळांना केंद्रिय महामंडळाकडून ५५० कोटीच्या वाढीव कर्जाला हमी देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने प्रस्ताव सादर केलेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील सामाजिक व आर्थिक मागासवर्गातील युवकांना स्वयंपूर्ण करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, सदर शासन निर्णय अनावधानाने या विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेला होता. तथापि, सदरचा शासन निर्णय रद्द करुन सुधारित शासन निर्णय वित्त विभागामार्फत निर्गमित झालेला आहे.

(२) होय, हे अंशतः खरे असून या विभागांतर्गत कार्यरत ५ मागासवर्गीय व १ अपंग महामंडळांकरीता केंद्रीय महामंडळांकडून रु. ५५५.०० कोटीचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर करण्यात आला होता.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही, तथापि राज्यातील सामाजिक व आर्थिक मागासवर्गातील युवकांना स्वयंपूर्ण करण्यासाठी कार्यरत ६ महामंडळांकडून स्वयं रोजगाराच्या विविध योजनांतर्गत कर्ज पुरवठा करण्यात येतो.

-----------------

**टोल करार तपासण्यासाठी नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितिच्या अहवालाबाबत**

**(६०) * ४१५६ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, खारघर व अन्य ठिकाणी टोलविरोधात आंदोलन सुरु झाल्यावर टोल करार तपासण्यासाठी उच्चस्तरीय समित्या नेमण्याची घोषणा मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार शासन आणि जनतेच्या हिताची फसवणूक करण्यात आल्याचे दिसून आल्यास टोल रद्द करण्यासाठी कारवाई करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने राज्य शासनाला अहवाल दिला आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील किती टोलनाक्यावर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) खाजगीकरणांतर्गत करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या व पथकर स्थानकांच्या अडचणीबाबत अभ्यासगट समिती स्थापन करण्यात आली आहे.

(३) ते (५) समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**नागपूर विभागातील समाजकार्य महाविद्‌यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना नियमित वेतन मिळत नसल्याबाबत**

**(६१) * ५१२८ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागात सामाजिक न्याय विभागाअंतर्गत एकूण किती समाजकार्य महाविद्‌यालय कार्यरत आहेत,

(२) या समाजकार्य महाविद्‌यालयातील शिक्षक व कर्मचा-यांना दरमहा नियमित वेतन मिळत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे कोणती,
(४) नियमित वेतन देण्याबाबत शासन व्यवस्था करणार आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नागपूर विभागात २० समाजकार्य महाविद्यालये कार्यरत आहेत.
(२) अंशतः खरे आहे.
(३) पुरेशी तरतूद उपलब्ध झाली नाही.
(४) चालू वर्षी वेतनासाठी प्राप्त झालेली १००% तरतूद वितरीत करण्यात आली आहे तसेच सुधारित आठमाही अंदाजपत्रकामध्ये व पुरवणी मागणीद्वारे निधीची मागणी केली आहे.

-----------------

**राज्यातील साखर कारखान्यांनी एमआरपीप्रमाणे शासनाकडे देयके दिलेली नसल्याबाबत**

**(६२) * ४४६३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरु होऊन दीड महिना झाला तरी बहुतांशी कारखान्यांनी एमआरपीप्रमाणे शासनाकडे देयके दिलेली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील १४ कारखान्यांनी एफआरपीचे उल्लंघन केले असून याबाबतचा प्रस्ताव विभागीय साखर सहसंचालकांकडून साखर आयुक्तांकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली असता दोषी आढळून येणाऱ्या साखर सह संचालकांवर काय कारवाई केली वा करणार आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

केंद्र शासनामार्फत प्रत्येक हंगामाकरिता ऊसाला रास्त व किफायतशीर भाव (एफआरपी) जाहीर केला जातो आणि राज्यातील हंगाम घेणा-या सर्व साखर कारखान्यांना ऊस नियंत्रण आदेश, १९६६ मधील तरतूदीनुसार विहीत मुदतीत ऊस पुरवठादार शेतक-यांना किमान FRP प्रमाणे दर देणे बंधनकारक असते.

सन २०१४-१५ चे हंगामाचे सुरूवातीस साखरेचे दर रु.२६५०/- प्रति क्विंटल होते. त्यामध्ये घसरण होवून आजअखेर रु.२४५०/- पर्यंत दर खाली आलेले आहेत. देशात तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात सातत्याने साखरेच्या दरामध्ये घसरण होत आहे. साखरेचे दर तसेच उपपदार्थ जसे मोलॅसिस, बगॅस, स्पिरीट, एस.डी.इ.चे दरही कमी झालेले आहेत. त्यामुळे निधी उपलब्धतेच्या अडचणीमुळे बहुतेक कारखान्यांनी FRP त्याप्रमाणे दर दिलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर यांचेकडील दि.१९/१२/२०१४ व दि.२६/१२/२०१४ चे पत्रान्वये कोल्हापूर विभागामध्ये एफआरपी प्रमाणे ऊसदर शेतक-यांना अदा केले नसलेबाबत १६ कारखान्यांचे कारवाईचे प्रस्ताव साखर आयुक्तालयाकडे सादर केले. याबाबत साखर आयुक्तालयामध्ये संबंधित कारखान्यांच्या दि.१३/१/२०१५ व दि.२७/०१/२०१५ रोजी सुनावण्या घेण्यात येवून FRP प्रमाणे ऊसदर अदा करणेबाबत कारखान्यांना सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील देवगांव रंगारी ते गल्ले बोरगाव या बारा कि.मी. रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्याबाबत**

**(६३) * ५४४७ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील देवगांव रंगारी ते गल्ले बोरगाव या बारा कि.मी. रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्यामुळे वाहतुकीची मोठया प्रमाणात कोंडी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन १२ कि.मी. लांबीपैकी ७ कि.मी. लांबीतील खड्डे भरण्यात आले आहेत. ३ कि.मी. लांबीतील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे. २ कि.मी. लांबीतील कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होताच काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.